


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीची प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com





वर्ष ३ रे | अंक : ७४६. वा | रविवार | दि. २१ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# त्याच खोलीत अमित शहा कशाला आले होते, फडणवीस अन् शहांवर उद्धव ठाकरेंची खोचक टीका...

वृत्तसंस्था/मुंबई

मातोश्रीमधील ज्या खोलीला तुम्ही कुठली तरी खोली म्हणत आहात, ती मातोश्रीमधील बाळासाहेबांची खोली आहे. ती खोली आमच्यासाठी मंदिर आहे. त्याच खोलीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा बाळासाहेबांसमोर नाक रगडायला आले होतेफ अशी टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील सभेत केली. तर त्या खोलीत त्यावेळी अमित शहा यांनी फडणवीस यांना प्रवेशही दिला नव्हता, असा दावाही त्यांनी यावेळी केला.दक्षिण मध्य मुंबईचे महायुतीचे उमेदवार अनिल देसाई यांच्या प्रचारार्थ शनिवारी मुंबईतील अँटॉप हिल येथे प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टीका केली. यावेळी महाविकास आघाडीच्या मित्र पक्षातील काँग्रेसचे नेते भाई जगताप, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या राखी जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.देवेंद्र फडणवीस मला भ्रमिष्ठ म्हणाले. पण मी भ्रमिष्ठ आहे की नाही ते जनता ठरवेल. फडणवीस, जनाची नाही तरी मनाची ठेवा. हे दोन्ही तुमच्याकडे नाही. लाज लज्जा सोडलेला कोडगा माणूस म्हणजे देवेंद्र फडणवीस आहेतफ अशा शब्दात त्यांनी फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडले. ङ्गआज तुमच्यासमोर लोकांनी रान पेटवले आहे, तुमच्या चेल्यांना गावबंदी केली आहे. नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला २०१४ साली सांगितले की, पाच वर्षांनी तुमच्या हातात या काही गोष्टी असतील. २०१९ मध्ये पुढच्या पाच वर्षांत या गोष्टी असतील. आता तर थेट २०४७च्या गोष्टी सांगतात. तोपर्यंत कुणी असेल काफ असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला. विशाल पाटील समजूतदार आहेत. ते आमचे शत्रू नाहीत. ते आमच्याच कुटुंबातील असून, उद्धव ठाकरे यांचे त्यांच्यावर प्रेम आहे आणि त्यांना उद्धव ठाकरे यांच्याबद्दल आदर आहे. त्यांच्याशी आमचा सुसंवाद आहे,फ असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी





सांगलीत सांगितले. राऊत म्हणाले, ङ्गविशाल पाटील यांच्यावर आमचा विश्वास आहे. आम्ही २२ एप्रिलपर्यंत वाट पाहू. आमदार विश्वजीत कदम हे लवकरच महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारात दिसतील.दरम्यान, ङ्गमहाराष्ट्राला जर संधी मिळाली, तर उद्धव ठाकरे पंतप्रधान का नाही होणार,फ असेही राऊत यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. शरद पवार उद्धव ठाकरे यांच्या पंतप्रधानासाठी पाठिंबा देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला

# मतदानासाठी १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य...

जनसंचलन/बुलढाणा

येत्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये दि. २६ एप्रिल रोजी मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने ईपीक म्हणजेच मतदार फोटो ओळखपत्र आणि इतर १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. यापैकी कोणताही एक ओळखीचा पुरावा मतदार केंद्रावरील अधिकाऱ्यांना दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता छायाचित्रासह मतदार ओळखपत्र म्हणजेच ईपीक देण्यात आले आहे. ते मतदार मतदानकेंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. परंतू मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र नसल्यास अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त इतर १२ पुराव्यांपैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहेत.मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी स्वत:ची ओळख पटविण्यासाठी पुराव्यांमध्ये आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक किंवा पोस्ट ऑफिसने जारी केलेले छायाचित्र असलेले पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्टार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र, राज्य सरकार, सार्वजनिक उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपनी यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार, आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष



विकलांगता प्रमाणपत्र असे १२ कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहेत. मतदारांना छायाचित्रासह मतदार ओळखपत्र देण्यात आलेले आहेत, ते मतदान मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. ईपीक सादर करणे शक्य नसल्यास इतर १२ प्रकारच्या ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्राचा उपयोग करून मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# घाटपूरी येथे घराला आग संसारिक साहित्य जाळून टाका

जनसंचलन/ खामगाव

शहरापासून जवळच असलेल्या घाटपुरी येथे एका मजूर महिलेच्या घराला आग लागून मोठे नुकसान झाले आहे. या आगीत घरातील सर्व संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे. घाटपुरी येथील पिंपळगाव राजा रोडवर राहणाऱ्या सौ. कामिनीबाई सदाशिव ठाकरे या नेहमीप्रमाणे घराच्या वसरीमध्ये स्वयंपाक करून शेतात कामाला निघून गेल्या होत्या. मात्र दरम्यान चुलीत विस्तव तसाच असल्याने काही वेळाने हवेमुळे विस्तवातून जाळ होऊन घराला आग लागली. थोड्याच वेळात आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण घर पेटले. नागरिकांनी धावपळ करत घरातील गॅस सिलेंडर कसे बसे बाहेर काढले. यामुळे मोठा अनर्थ टळला. मोठ्या प्रमाणावर आग भडकल्याने शेजारी असलेल्या जगन्नाथ प्रकाश सोळंके यांच्या घरालेही पेट घेतला. घटनेची माहिती मिळताच खामगाव न.प. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली. या आगीत सौ. कामिनीबाई ठाकरे यांच्या घरातील धान्यसह कुलर, कपाट यासह संसार उपयोगी आदी साहित्य जळून खाक झाले. तसेच सोळंके यांच्या घराचे बाहेरील कंपाऊंड व काही साहित्य जळाले. या आगीत जवळपास एक लाख रुपयांच्या वर नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोस्टेचे पीएसआय अनिल भगत, पोकॉ. रवींद्र मोरे, रफिक शेख, चालक भगवान खोसे हे देखील घटनास्थळी गेले होते.

# संदीप शेळकेंचा मेहकर,डोणगाव येथील रोड शो ठरला सुपरहिट!

## प्रचारही जोमात सामान्यांचा आवाज दिल्लीच्या तख्तावर बुलंद करायचाय

**जनसंचलन/बुलढाणा**

तुम्ही इतकी वर्ष झाली प्रस्थापित नेत्यांना मते दिले. परंतु ते स्वतः ला राजे समजायला लागले आहेत. सामान्य जनतेकडे पाहायला त्यांना वेळ मिळत नाही. फक्त निवडणूक आली की जनतेजवळ यायचं आणि मतं मागायची. त्यांनी कधी विकासाची भाषा केली नाही, स्वतःच्या हितासाठी ते निवडणूक लढवत आले आहेत. अशा शब्दात अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. आणि वन बुलढाणा मिशनच्या माध्यमातून सामान्यांचा आवाज दिल्लीच्या तख्तावर बुलंद करायचा आहे असे प्रतिपादन केले. काल शुक्रवार, १९ एप्रिलला संदीप शेळके यांच्या प्रचारासाठी मेहकर, डोणगाव येथे रोडशो काढण्यात आला होता. यावेळी प्रचंड प्रमाणात सामान्य जनता सहभागी झाल्याने रोडशो सुपरहिट ठरला, अन् संदीप शेळके यांचे भाषणही वादळी ठरले. बुलढाणा लोकसभेचे अपक्ष उमेदवार तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांचा जिल्हाभर झंझावती प्रचार सुरू आहे. सगळ्यात आधी प्रचाराला सुरूवात करून संदीप शेळकेंनी प्रचारात आघाडी घेतली आहे. ठिकठिकाणी त्यांचा रोडशो काढण्यात येत आहे. यावेळी सामान्य जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांना मिळतोय. गावोगावी शेळके यांचे जंगी स्वागत करण्यात येत आहे. दरम्यान , काल शुक्रवारी निघालेल्या रोड शो दरम्यान जनतेशी संवाद साधताना ते म्हणाले की, प्रस्थापित लोकांच्या विरुद्ध तुम्हाला ताकदीने उतरावे लागणार आहे. जिल्ह्याचे भवितव्य घडवण्यासाठी सगळ्यांना आता क्रांती करायची आहे. दादा, भाऊ, साहेबांसाठी नाहीतर सामान्य माणसाच्या विकासासाठी आपल्याला मतदान करायचे आहे. धनशक्ती विरुद्ध ही लढाई आहे.



तुमच्या पाठबळातून आपल्याला जिल्ह्याच्या विकासाचा ध्येय पूर्ण करायचे आहे. आपण विकासाचीच भूमिका घेऊन वाटचाल करत आहोत. आज जर जिल्ह्याच्या विकासासाठी विचार केला नाही तर भविष्यात अत्यंत भीषण अवस्था झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे हा विचार करून मतदानरुपी आशीर्वाद देण्याचे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्याचा कायपालट केल्याशिवाय मी शांत बसणार नाही. असा शब्द यावेळी शेळकेंनी उपस्थित जनसमूहाला दिला. तसेच दिल्लीच्या तख्तावर बुलढाणा जिल्ह्यातील जनसामान्यांचा आवाज आपल्याला बुलंद करायचा आहे असेही शेळके म्हणाले.

# गोडावून फोडून ४ लाखाचें वीज साहित्य लंपास

**जनसंचलन/मलकापूर**

बोदवड रोडवर शेतात असलेल्या वीज कंत्राटदाराचे गोडावून फोडून सूमारे चार लाख रूपयांचे वीज साहित्य चोरट्यांनी लंपास केल्याची घटना १४ एप्रिल रोजी उघडकीस आली. याबाबत मलकापूर शहर पो. स्टे. ला तक्रार देण्यात आली आहे. विद्युत कंत्राटदार उदयसिह साहेबसिंह राजपुत रा. मलकापूर यांनी शहर पोलीस स्टेशनला येवून तोंडी रिपोर्ट दिला की, त्यांचे विद्युत मालाचे बोदवड रोडवर शेतामध्ये गोडावून असून १३ एप्रिल रोजी सायंकाळी मी व सुपर वायझर दिलीप साठे गोडावून बंद करून घरी परत आलो होतो. त्यानंतर १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता माझे शेताचे शेजारील शेतकरी विलास धायडे रा. जांभुळधाबा यांचा मला फोन आला व त्यांनी मला सांगीतले की तुमच्या गोडावूनच्या गेटचे तसेच आतील दरवाज्याचे कुलुप तुटलेले दिसत आहे. त्यानंतर मी व माझा मित्र प्रशांत जाधव गोडावूनवर गेलो व बाहेरुनच गोडावूनची पाहणी केली असता आम्हाला गोडावूनच्या गेटचा कोंडा तुटलेला दिसून आला. तसेच आतील दरवाज्याचे कडीकोंडा कटरने कापलेले दिसून आले. तसेच तेथे लावण्यात आलेले सिसीटीव्हीची सुध्दा तोडफोड केलेले दिसून आली. याबाबतची माहिती पोलिसांना दिली असता पोलिस आल्यानंतर गोडावूनमध्ये ठेवलेल्या मालाची पाहणी केली. त्यावेळी गोडावूनमध्ये ठेवलेला वेगवेगळ्या प्रकारचे वीज साहित्य अंदाजे किंमत ४ लाख ०५ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेला असल्याचे आढळून आले. तरी सदर चोरट्यांचा शोध घेण्यात यावा, अशी तक्रार उदयसिंह राजपूत यांनी दिली आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्यात होणार आजपासून घरून मतदान...

## टपाली मतपत्रिकेद्वारे होणार मतदान

**जनसंचलन/बुलडाणा**

लोकसभा निवडणुकीत प्रथमच दिव्यांग आणि ८५ वर्षावरील मतदारांना घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे. जिल्हाभरातून घरून मतदानाची मागणी नोंदणी नोंदविलेल्या २ हजार ८६३ मतदारांकडून रविवार, दि. २१ एप्रिलपासून मतदान करुन घेतले जाणार आहे. यासाठी १०१ स्वतंत्र पथक निर्माण करण्यात आले आहे. मागणी नोंदविलेल्या दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना घरून मतदानाची सुविधा देण्यात आली आहे. संबंधित मतदारांना मतदानाची आगाऊ सूचना देण्यात यावी. विहित केलेल्या दिनांक आणि कालावधीत मतदारांकडून मतदान करून घ्यावे. अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिल्या आहे. येत्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक, तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले दिव्यांग मतदारांच्या मागणीनुसार रविवारपासून घरपोच मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. जिल्ह्यात २ हजार १७१ ज्येष्ठ नागरिक आणि ६९२ दिव्यांग असे एकूण २ हजार ८६३ मतदारांच्या घरी जाऊन मतदान पथकामार्फत मतदान करुन घेण्यात येणार आहे. मतदान टपाली मतपत्रिकेद्वारे होणार आहे. जिल्ह्यात दि. २१ ते २३ एप्रिल २०२४ दरम्यान सदर मतदान प्रक्रिया होणार आहे. बुलडाणा विधानसभा मतदारसंघात ११२ ज्येष्ठ नागरिक, ८४ दिव्यांग असे १९६, चिखली विधानसभा मतदारसंघात ३१८ ज्येष्ठ नागरिक, ९६ दिव्यांग असे ४१४, सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात ५३९ ज्येष्ठ नागरिक, ८९ दिव्यांग असे ६२८, मेहकर विधानसभा मतदारसंघात ८२० ज्येष्ठ नागरिक, २८३ दिव्यांग असे सर्वाधिक १ हजार १०३, खामगाव विधानसभा मतदारसंघात १२० ज्येष्ठ नागरिक, ८३ दिव्यांग असे २०३, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात २६२ ज्येष्ठ नागरिक, ५७ दिव्यांग असे ३१९, असे २ हजार १७१ आणि दिव्यांग ६९२ असे एकूण २ हजार ८६३ मतदारांना घरपोच मतदान सुविधेचा लाभ देण्यात येणार आहे. ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदार असलेल्या बुलडाणा विधानसभा मतदारसंघ येथे १९६ मतदारांसाठी १० पथक, चिखली येथे ४१४ मतदारांसाठी २० पथक, सिंदखेड राजा येथे ६२८ मतदारांसाठी १९ पथक, मेहकर येथे १ हजार १०३ मतदारांसाठी ३२ पथक, खामगाव येथे २०३ मतदारांसाठी १० पथक, जळगाव जामोद येथे ३१९ मतदारांसाठी १० पथक, असे एकूण १०१ पथक घरोघरी जाऊन मतदान प्रक्रिया राबवणार आहेत. या मतदान पथकामध्ये २ मतदान अधिकारी हे सूक्ष्म निरीक्षक, १ व्हिडीओग्राफर, १ पोलिस कर्मचारी यांचा समावेश आहे. घरून मतदानाची प्रक्रिया पारदर्शीपणे, तसेच मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी उमेदवार स्वत: अथवा आपला प्रतिनिधी नियुक्त करुन मतदान प्रक्रियेचे निरीक्षण करु शकतील. याप्रक्रियेमध्ये मतदारांना टपाली मतपत्रिकेवर खूण करुन आपले मतदान नोंदविता येईल. तसेच मतदान नोंदविल्यानंतर मतदारांच्या बोटाला पक्की शाईची खूण करण्यात येणार आहे. तसेच या संपूर्ण प्रक्रियेचे चमूकडून चित्रीकरण करण्यात येईल. अंध व्यक्तींसाठी मतदान करताना विशेष सोय करण्यात आली आहे. निवडणुकीत २१ उमेदवार आणि १ नोटा असल्याने मतपत्रिकेचे दोन भाग असणार आहे. एका मतपत्रिकेवर १६ उमेदवार आणि उर्वरीत उमेदवार दुसऱ्या मतपत्रिकेवर असणार आहे. अंध व्यक्तींसाठी ब्रेल लिपीतील मतपत्रिका पुरविण्यात येणार आहे. तसेच अंध दिव्यांग व्यक्तींना सोबत्याची मदत घेऊन देखील मतदान करता येणार आहे. दररोज मतदान संपल्यानंतर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात सर्व पथकातील टपाली मतपत्रिकेचे एकत्रिकरण करण्यात येवून सर्व टपाली मतपत्रिकेचे पाकिटे हे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील स्ट्राँगरुममध्ये सुरक्षित ठेवण्यात येणार आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदान पथकांचा तारखेनिहाय नियोजन केलेले असून त्यास मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात आली आहे. याबाबत मतदार, तसेच उमेदवार यांनादेखील कळविण्यात आले आहे. तरी या कालावधीत उपरोक्त मतदारांनी बाहेरगावी जाऊ नये, अथवा गैरहजर राहू नये, तसेच सदर मतदान प्रक्रियेचा लाभ घेऊन सर्व मतदारांनी मतदान करावे व लोकशाहीच्या या उत्सवामध्ये आपला सहभाग नोंदवून लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी या घटकाने पुढे येऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# बकऱ्या धुण्याकरिता गेलेल्या युवकाचा धरणात बुडून मृत्य



**जनसंचलन/मोताळा**

तालुक्यातील धामणगाव देशमुख येथील २३ वर्षीय बकऱ्या धुण्याकरिता युवक तलावावर गेला होता. तेथे त्याचा पाय घसरल्याने धरणात बुडून मृत्यू झाल्याची घटना १८ एप्रिल रोजी दुपारी घडली. याप्रकरणी तक्रारीवरून बोराखेडी पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तालुक्यातील धामणगाव देशमुख येथील प्रकाश चंदन बिचकुले यांनी बोराखेडी पोलिसात याबाबत तक्रार दिली. त्यानुसार गावातील संदीप गुलाब बिचकुले (२३) हा युवक १८ एप्रिल रोजी गावशिवारातील धरणावर बकऱ्या धुण्याकरिता गेला होता. यादरम्यान त्याचा पाय घसरून तो खोल पाण्यात गेला व पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला, अशा प्रकारची प्रकाश बिचकुले यांनी बोराखेडी पोलिसात तक्रार दिली. त्यावरून बोराखेडी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेचा पुढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक यशवंत तायडे आणि पोलिस कॉन्स्टेबल सुनील भवटे हे करीत आहेत.

# शेती देण्याचा वाद, पित्याला २ मुलांनी केली काठीने मारहाण



**जनसंचलन/ खामगाव**

शेती देण्याच्या कारणावरून दोन मुलांनी वडिलांशी संगनमत करून वाद घातला. तसेच मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. गुरुवारी रात्री ही घटना तालुक्यातील वाकूड येथे तक्रारीनुसार, विठ्ठल नारायण लाहूडकार (६८) यांच्याशी त्यांचा मुलगा संदीप लाहूडकार याने मद्यपान करून वाद घातला. त्यामुळे ते दुसरा मुलगा प्रदीप लाहुडकार याच्याकडे गेले असता त्याने सुद्धा त्यांच्याशी वाद घातला. तसेच संदीपला चिथावणी दिल्याने त्याने आपल्या पायावर व डोक्यावर काठीने मारून जखमी केले. तर प्रदीपने चापटा बुक्क्यांनी मारहाण केली. अश्लील शिवीगाळ केल्याचेही पिंपळगाव राजा पोलिस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रारीत म्हटले. या तक्रारीवरून पिंपळगाव राजा पोलिसांनी दोन्ही मुलांविरोधात मारहाण करून शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

# २३ वर्षीय विवाहित महिला बेपत्ता

**जनसंचलन/हिवरा आश्रम**

घरी कोणालाही न सांगता २३ वर्षीय विवाहिता आपल्यालहान बाळासह घरून निघून गेल्याची घटना हिवरा आश्रम येथे घडली. हकीकत अशी की, सौ. कोमल सर्वेश द्विवेदी वय २३ वर्ष ही विवाहित महिला तिच्या लहान बाळासह पार्थ सर्वेश द्विवेदी वय १ वर्ष ही १८ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० ते ६ वाजेदरम्यान घरून निघून गेली. तिचे सासरे अनिलकुमार द्विवेदी हे जागृत देवस्थान श्रीक्षेत्र ओलांडेश्वर संस्थान दुधा ब्रम्हपूरी येथे महादेवाच्या दर्शनाला गेले असता. याच गोष्टीचा फायदा घेवून सौ. कोमल व तिच्या लहान बाळासह घरून निघून गेली. तिचे सासरे व पती यांनी शेजारी व आजुबाजुला व नातेवाइकांकडे शोध घेतला असता आढळून आली नाही. दरम्यान तिचे सासरे अनिल कुमार जोखाराम द्विवेदी वय ५९ वर्ष सेवानिवृत्त शिक्षक विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय रा हिवरा आश्रम यांनी साखरखेर्डा पो. स्टे. मध्ये तक्रार दिली. यावरून पोलिसांनी हरविल्याची नोंद केली आहे. सदर विवाहिता कोणाला आढळल्यास ९४२२७४८५९०, ८७८८२८७३७ या क्रमांकाशी संपर्क साधवा असे आवाहन वतीने करण्यात आले आहे.

# बंद घरात चोरीचा प्रयत्न केला मात्र पाठलाग करून पकडला...

**जनसंचलन/ खामगाव**

आजारी नातेवाईकाला पाहण्यासाठी कुटुंबिय गेल्याची संधी साधून एका चोरट्याने बंद घर फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, चोरटा चोरी करीत असतानाच घरातील सदस्य परत आल्याने चोरटा मागील दरवाजाने पळत निघाला. यावेळी त्याचा पाठलाग करून पकडण्यात आल्याची घटना १७ एप्रिल रोजी दुपारी बर्डे प्लॉट भागात घडली. याबाबत बर्डे प्लॉट भागातीलरहिवासी शेख अनिस शेख रशीद (४५) यांच्या सासूचे डोळ्याचे ऑपरेशन झाले असून, त्यांची प्रकृती पाहण्यासाठी ते कुटुंबासोबत बर्डे प्लॉट भागातील सासुरवाडीत घराला कुलूप लावून गेले होते. शेख अनिस हे त्यांच्या सासूची प्रकृती पाहल्यानंतर कुटुंबियांसह घरी परतले. लोखंडी ग्रीलच्या दरवाजाला लावलेले कुलूप उघडून आत प्रवेश केला असता, त्यांना चॅनेल गेटचे कुलूप तुटलेले आढळून आले. त्यावेळी त्यांच्या पत्नीने मागील बाजूने जावून पाहिले असता, घरातील लोखंडी कपाट उघडे दिसले. घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले आढळून आले. घटना पाहताच, पत्नीने आरडा ओरडा केला असता, बर्डेप्लॉट भागातील एक चोरटा तिच्या हाताला झटका देऊन पळून गेला. आरडाओरडा ऐकल्याने पाठलाग करून शेख मुज्जमील शेख आसीफ (२०) रा बर्डे प्लॉट याला पकडले. त्यावेळी त्याने घर बंद असल्याने चोरीचा प्रयत्न केल्याची कबुली दिली. या घटनेमुळे कपाटाचे तीन- हजार रूपयांचे नुकसान झाले असून, आरोपीला पकडून बर्डेप्लॉट पोलीस चौकीत हजर केल्याचे तक्रारीत नमूद केले. या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिसांनी चोरट्याविरुध्द कलम ४५४, ३८०, ५११, ४२७ भादंवीनुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोहेकॉ. विजय उभे हे करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गल्लीतला दादा अन् दिल्लीतला दादा सारखाच : ॲड.बाळासाहेब आंबेडकर

## देशाला दादागिरी करणारा नव्हे तर माणूसकी जपणारा पंतप्रधान हवा...




**जनसंचलन/ चिखली**

देशातील लोकसभा निवडणूक ही महत्वाच्या टप्प्यावर येवून ठेपली असून समान व्यवस्थेचे आवाहन देशापुढे उभे ठाकले आहे. या देशात पुढे काय काय घडणार आहे हे निश्चित सांगता येणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या भाषणात अगदी बेंबीच्या देठापासून बाबासाहेब पुन्हा आले तरी या देशाचे संविधान बदलणार नाही असा प्रचार करताहेत. मोदी स्वत:सह आपल्याला फसवत असून मोदीने हा जुमला केला आहे. संविधान बदलण्याचा आरोप मोदी व आरएसएस वर केला जात असून बाबासाहेब येणारच नाही तर बदलणार कुठून? तर ते मोदी बदलणार असा प्रचार केला जात असून त्याला जनतेने बळी पडू नये, गल्लीतला दादा आणि दिल्लीतला दादा यात फरक काय? तर या देशाला माणूसकी जपणारा पंतप्रधान हवा असे आवाहन ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांनी आज ता. १९ रोजी वंचित बहुजन आघाडीचे लोकसभेचे उमेदवार वसंतराव मगर यांच्या प्रचारसभेदरम्यान केले. यावेळी व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष निलेश जाधव, राज्य अध्यक्षा सविताताई मुंढे, बुलढाणा महिला अध्यक्षा विशाखाताई सावंत, चिखली ता.अध्यक्ष संजय धुरंधर, शहराध्यक्ष बाळासाहेब भिसे, प्रदीप वाकोडे, अर्जुन बोर्डे, सुमेध जाधव उपस्थित होते. आभार प्रदर्शन प्रदीप वाकोडे यांनी केले.

ॲड.बाळासाहेब म्हणाले, मोदीने पंतप्रधान झाल्यावर या देशाचे संविधान बदलणार की नाही बदलणार हे अगोदर स्पष्ट करावे, जोपर्यंत याबाबत मोदी ठोस आश्वासन देत नाही तोपर्यंत तो आपणा सर्वांना फसवतोय. मोदी असे का बोलतोय याचा विचार आपण सर्वांना केला पाहिजे. या देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीताराम यांचे यजमान प्रभाकरन यांनी दिलेली मुलाखत देशातील सर्वांच्या डोळ्यांत अंजन घालणारी आहे. त्यांनी सांगितले आहे की, मोदी पुन्हा पंतप्रधान झाल्यास या देशाचे संविधान बदलण्यात येणार असून, गोध्रा व मणिपूर प्रकरणात जे काही घडले ते भविष्यात मोदी सत्तेवर आल्यास देशात ते जागोजागी घडू शकते तसेच पंतप्रधान मोदींची ही शेवटची निवडणुक असेल. एकाप्रकारे मंत्रीपद घालविणारी तसेच स्वत:च्या कुटूंबाचा जीव धोक्यात घालणारी ही मुलाखत ठरू शकते. नेमके जनतेला याबाबत आगाह करण्याचा प्रयत्न करीत आहे. मोदी सत्तेत आल्यास देशाचा नकाशा नक्कीच बदलणार आहे. शिवसेना व कॉंग्रेस कार्यकर्त्यांना या जुलमी सरकारला धडा शिकविण्याची संधी असून दुर्देवाने कॉंग्रेसने शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यावर विश्वास ठेवला मात्र कॉंग्रेसचे किती उमेदवार निवडून येतील हा प्रश्नचिन्ह आहे. या देशातील १७ लाख हिंदू कुटुंब ज्यांची संपत्ती ५० कोटीच्या वर आहेत ते केवळ देशच नव्हे तर नागरिकता देखील सोडत आहेत. आणि दुसरीकडे याविरूद्ध जगातील सर्व हिंदू नागरिकांना प्रतिनिधीत्व देण्याच्या गप्पा मारल्या जात आहेत. असे सरकार आपल्याला पाहिजे का हा सारासार विचार आपण करून वंचित बहुजन आघाडीच्या लोकसभा उमेदवार वसंतराव मगर यांना बहुसंख्येने निवडून द्यावे असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी केले. या देशातील बळीराजाला भिकेला लावणार्या भाजपा सरकारला नेस्तानाबूत करण्याची वेळ आली असून गोरगरिब, कष्टकरी, शेतमजूर व तळागळातील सामान्य कार्यकर्त्यांना न्याय देण्याकरिता मला प्रचंड मतांनी निवडून द्यावे असे आवाहन लोकसभेचे उमेदवार वसंतराव मगर यांनी यावेळी केले.

### इलेक्ट्रॉल बॉण्डसह भाजपाचे घोटाळे...

भाजप सरकारने इलेक्ट्रॉल बॉण्डच्या माध्यमातून मोठा घोटाळा केला असून त्याबाबतची माहिती जाहीर करावी. या माध्यमातून मोदी दादागिरी करून वसुली करणारा दादा म्हणजे गल्लीतला दादा व दिल्लीतला दादा सारखेच झाले आहे. ठिकठिकाणी ईडी व इतर वित्तीय संस्थांचा गैरवापर करीत तब्बल १३ हजार कोटी रूपये यांनी प्राप्त केले आहेत. सोबतच बोर्फार्स प्रकरणाची आठवण करून देत १३५ राफेल विमान खरेदी करण्याचा करार रद्द करून केवळ ३५ विमाने अंबानीकडून घेतले आहेत. उरलेली विमाने कुठे तयार करणार हे अंबानीने अद्यापपर्यंत सांगितलेले नाही. चायना हा आपल्या छाताडावर येवून बसलेला असून भाजपाने चायनाकडून पैसे घेतल्याचे उघड झाले आहे. एकेकाळी मोदींचे गुणगान करणारे रिटायर्ड फौजी अधिकारी मोदींना आज शिव्या घालत असून इंदिरा गांधींनी पाकिस्तानचे दोन तुकडे केल्याचे सांगत गेल्या ६ महिन्यात पाकिस्तानचा एकही सैनिक ठार मारल्याची बातमी आपण ऐकली काय? असा प्रतिप्रश्न केला. हे सरकार शेतकर्यांच्या मूळावर उठले असून सरकार कमकुवत झाले असून यांची सत्तेबाहेर जाण्याची वेळ आल्याचे शेवटी सांगितले.

---

## त्या दुचाकी चोरी प्रकरणात आणखी तीन दुचाकी जप्त दोघांना न्यायालयीन कोठडी

**जनसंचलन/मोताळा**

दुचाकी चोरी प्रकरणात तीन जणांना बोराखेडी पोलिसांनी १८ एप्रिल रोजी ताब्यात घेत त्यांच्याकडून सुमारे ३ लाख ९५ हजार रुपये किमतीच्या सात दुचाकी जप्त करण्यात आल्या होत्या. या प्रकरणात १९ एप्रिल रोजी आणखी तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. २० एप्रिल रोजी पोलिस कोठडी संपल्याने त्यांना न्यायालयात हजर केले असता एकास फत्तेपूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले, तर दोघांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. खरबडी येथील मोहसीन शाह यांची खरबडी रोडवरील दुकानासमोरून १७ एप्रिल रोजी चोरी गेलेल्या दुचाकीच्या घटनेत बोराखेडी पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर बोराखेडी पोलिसांनी पथक तयार करून मोताळा येथील अयान खान नूरहसन खान, शे. मुजम्मील शे. रफीक आणी रिधोरा जहांगीर येथील विश्वराज प्रकाश सुरडकर या तिघांना १८ एप्रिल रोजी ताब्यात घेतले होते. त्यांच्याकडून सात दुचाकी अंदाजे ३ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या तिघांना न्यायालयाने २० एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. दरम्यान, १९ एप्रिल रोजी या प्रकरणात आणखी तीन दुचाकी अंदाजे १ लाख ६५ हजार रुपये किमतीच्या पोलिसांनी जप्त केल्या. अशा एकूण दहा दुचाकी अंदाजे ४ लाख ६० हजार रुपयांच्या पोलिसांनी आतापर्यंत जप्त केल्या आहेत. त्यामध्ये एका दुचाकीवर फत्तेपूर पोलिस ठाण्याअंतर्गत गुन्हा दाखल झालेला असल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून देण्यात आली आहे. २० एप्रिल रोजी आरोपींची पोलिस कोठडी संपल्याने तिघांना न्यायालयात हजर केले असता रिधोरा येथील विश्वराज प्रकाश सुरडकर यास न्यायालयाने जामीन मंजूर केला; परंतु त्यांना फत्तेपूर पोलिसांनी मागणी केल्यामुळे त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. उर्वरित अयान खान आणि शे. मुजम्मील या दोघांना न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याने त्यांची बुलढाणा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## बसची दुचाकीला धडक एक ठार, एक गंभीर जखमी...

**जनसंचलन/बीबी**




जालना-मेहकर महामार्गावर दुसरबीड आणि बीबी गावादरम्यान एसटी बसने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातामध्ये एक जण ठार झाला तर एक जण गंभीर जखमी झाला. हा अपघात २० एप्रिल रोजी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास घडला. जालन्याहून गडचिरोलीकडे जात असलेल्या एसटी महामंडळाच्या क्रमांकाच्या बसची दुचाकीला ही धडक लागली. त्यात अरुण पोहेकर (रा. मानेगाव खालसा, जि. जालना) हे जागीच ठार झाले तर अश्रुबा गाडेकर (रा. मुरादपूर, ता. चिखली) हे गंभीर जखमी झाले आहेत. अश्रुबा गाडेकर यांच्यावर दुसरबीड येथील खासगी रुग्णालयात प्रथमोपचार करून त्यांना जालना येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले आहे. अरुण पोहेकर हे कुंभार झरी (ता. जाफराबाद) येथे आपल्या नातेवाइकांकडे आले होते. तेथून सकाळी चिखली तालुक्यातील मुरादपूर येथील अश्रुबा गाडेकर यांच्यासोबत किनगावराजा मार्गे मेहकरकडे ते जात होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958